# जिल्हा परिषद, सोलापूर

अर्थ विभाग, जिल्हा परिषद, सिध्देश्वर पेठ, सोलापूर.४१३००१.
Email- cafozps@gmail.com दूरध्वनी. ०२१७-२७२६५४७.

जा.क्र.जिपसो/अर्थ/आस्था/कार्या-१/४९१/२२
**अर्थ विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर.**
दिनांकः- २८ /०४/२०२२.

**प्रति,**

**१) खातेप्रमुख, जिल्हा परिषद सोलापूर. -----------------**

**२) गट विकास अधिकारी, पं.स.(सर्व), ------------------**

**विषय :- सर्वसाधारण बदल्या सन २०२२.**
**प्रशासकीय व विनंती बदली कर्मचाऱ्यांची अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी**

**संदर्भ :-** या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिपसो/अर्थ/आस्था/कार्या-१/४५५/२२, दि.१८/०४/२०२२.

महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.१५/०५/२०१४ व दि.०२/०१/२०१७ व ०७/०३/२०१९ नुसार अर्थ विभागाकडील सहाय्यक लेखाधिकारी, कनिष्ठ लेखाधिकारी, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या लेखा संवर्गातील संदर्भिय पत्रान्वये प्रशासकीय बदली पात्र कर्मचाऱ्यांची व विनंती बदली पात्र कर्मचाऱ्यांची तात्पुरती वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या संदर्भात प्राप्त झालेल्या कागदपत्रे विचारात घेऊन लेखा संवर्गातील कर्मचाऱ्यांची प्रशासकीय व विनंती बदलीची अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादीमधील बदलीमधून सूट हवी असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी आवश्यक कागदपत्रासह उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

सदरची यादी सोबत जोडण्यात आलेली असून ती संबंधित सर्व कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणावी. तसेच सा.प्र.वि.-१ कडून प्रसिध्द करण्यात येणाऱ्या वेळापत्रकानुसार समुपदेशनासाठी उपस्थित राहण्याबाबत सुचित करावे व याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सोबत :- प्रपत्र १**

Alawar

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी (वरिष्ठ)**
**जिल्हा परिषद, सोलापूर.**

**प्रत- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांना माहितीसाठी सविनय सादर.**
**प्रत- उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि-१), जिल्हा परिषद सोलापूर यांना माहितीसाठी.**
**प्रतः- आय.टी.सी.एल.कक्ष, जि.प.सोलापूर.**
२/- सदरची वास्तव्य सेवा जेष्ठता यादी जि.प.च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.